# जिल्हाधिकारी

दि. 20-09-2001

जिल्हा प्रशासनातील जो सर्वात महत्वाचा घटक मानला जातो. त्यांनाच जिल्हाधिकारी असे म्हणतात. जिल्ह्यातील उर्वरित सर्व प्रशासन हे जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली चालत असते. यावरुन जिल्हा प्रशासनाचे प्रमुख हे जिल्हाधिकारी असतात. असे लक्षात येते जिल्ह्यातील पोलिस प्रशासन किंवा अन्य कोणतेही प्रशासन हे जिल्हाधिकारी यांच्याच नियंत्रणाखाली चालत असते. यांच्याच नियंत्रणाखाली चालत असते. त्यांच्याच नियंत्रणाखाली ही सर्व खाती किंवा विभाग कार्यरत असतात. असे हे ~~जिल्हाच~~ जिल्हाधिकारी पद यालाच जिल्हा दंडाधिकारी असेही म्हणतात. हे पद स्वातंत्र्य काळात निर्माण झालेले नसून भारतात प्राचीन काळापासून कोणत्या ना कोणत्या स्वरूपात जिल्हाधिकारी पद होतेच काळाच्या प्रवाहात कदाचित त्याचे स्वरूप बदलले असेल, नाव बदलले असेल पण अस्तित्व मात्र चिरंतन होते. कारण प्राचीन काळापासून महसूल वसूली हे कार्य चालत आलेले आहे. आणि महसूल वसूली या कामाशी जिल्हाधिकारी निगडीत आहे. आर्य काळात या पदाला 'विषयासंपत्ती' हे नाव होते. मोगल काळात 'आमलगुजार' या नावाने जिल्हाधिकारी याचे पद परिचित होते. ब्रिटीश काळामध्ये ईस्ट इंडिया कंपनी भारतात कार्यरत असताना याच पदाला 'पर्यवेक्षक' या नावाने हे पद ओळखले जात असे. परंतू 16 मे 1872 मध्ये गव्हर्नर वॉर्न ~~हेस्टिंग्ज~~ यांच्या काळात खऱ्या अर्थाने जिल्हाधिकारी हे पद ओळखले गेले. कलेक्टर या पदातच

दि. 20-09-2001

त्यांच्या कामाचे स्वरूप केंद्रीत झालेले दिसून येते. ब्रिटिश काळात जमीन महसूल गोळा करण्यासाठी ज्या पदाची निर्मिती झाली होती त्याच पदाला कलेक्टर हे नाव होते. त्या काळात इंग्रजांनी या पदाला दिलेले नाव स्वातंत्र्योत्तर काळात सुद्धा कायम आहे वस्तुतः आजची जिल्हाधीकारी यांची कार्य पाहता कलेक्टर हे नाव चूकीचे वाटते

कलेक्टरला जिल्हा दंडाधिकारी म्हणूनही ओळखले जाते. कारण पूर्वीच्या कलेक्टरच्या भूमीके पेक्षा आज या पदाची भूमीका व्यापक आहे कार्यक्षेत्र वाढले आहे. महसूल गोळा करण्याच्या कामाबरोबर मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अधिकारसुद्धा जिल्हाधीकाऱ्यांना प्राप्त झालेले आहेत. त्यामूळे स्वाभाविकपणे काही न्यायदान विषयक कार्य सुद्धा जिल्हाधिकारी यांच्याकडे असल्याने यांनाच जिल्हा दंडाधिकारी म्हणून ओळखले जाते आज भारतीय प्रशासकीय सेवेत जी काही पदे आहेत त्यामध्ये सर्वात महत्वाचे पद म्हणून जिल्हाधिकारी पदाकडे पाहिले जाते.

जिल्हाधिकारी पदाचे महत्व -

जिल्हाधिकारी पद हे खालील मुद्यावर स्पष्ट करता येईल.

(1) जिल्हा प्रशासनाच्या पाठीचा कणा म्हणून ओळखला जातो
(2) जिल्हा प्रशासनाचा कलेक्टर आधारस्तंभ मानला जातो
(3) कल्याणकारी योजनांचा हा शिल्पकार असतो
(4) विकास योजना जनसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करणारा हा प्रमुख प्रशासक होय
(5) जिल्हाधीकारी हा जिल्ह्याच्या प्रशासनाचा प्रमुख अधिपती मानला जातो

दि. 20-09-2001

(6) जिल्हाधिकाऱ्याला केंद्र सरकार किंवा राज्य सरकार यांचा कान व डोळे समजले जाते.

(7) राज्यसरकारचा तो एक विश्वासू असतो

(8) सामान्य जनता व शासन यांच्यातील जिल्हाधीकारी हा दुवा असतो.

(9) जिल्हा प्रशासनाच्या नौकेचा तो सुकाणुधारी असतो

(10) जिल्हा प्रशासनाचा तो नियंत्रण असतो.

दि. 21-09-2001

जिल्हाधिकारी यांचे कार्ये -

जिल्हाधिकारी पदाचे महत्व विशद केल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या अधिकार आणि कार्यावर प्रकाश टाकणे क्रमप्राप्त ठरते. प्राचीन कालेमध्ययुगीन काळ आणि ब्रिटीश काळातील या पदाचे जे महत्व होते त्यापेक्षा अधिक महत्व स्वातंत्र्योत्तर काळात वाढले. राज्याची संकल्पना या दोन उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी विविध स्वरूपांच्या योजना ग्रामपातळीपर्यंत कार्यरत आणि त्याची अंमलबजावणी प्रभाविरित्या करण्याची जबाबदारी ही प्रशासनावरच आहे. आणि त्यामूळे लोकशाहीत जिल्हाधिकारी या पदाला अनन्य साधारण असे महत्व प्राप्त झाले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी जी कार्ये पार पाडतात ती याप्रमाणे आहेत. (1) प्रशासनाचा प्रमूख आधार =

(1) जिल्हाधिकारी हे जिल्ह्याचे प्रमुख प्रशासक मानले जातात प्रशासनाचे प्रमूख या नात्याने सर्व प्रकारची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्यावर येऊन पडते तोच जिल्ह्यातील सर्व प्रशासनासाठी जबाबदार असतो. राज्यातील प्रशासनाच्या एक अधिकारी म्हणून सुद्धा जिल्हाधीकारी कार्य करित असतो त्यानुसार ग्रामीण

दि. 21-09-2001

विकासासाठी जिल्ह्यात जे जे काही कार्यक्रम पार पाडले जातात. मग तो कार्यक्रम पार पाडले जातात मग तो कार्यक्रम हा केंद्रशासनाचा असो. राज्यसरकारचा अथवा राष्ट्रादया जागतिक संघटनेचा असो या कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रत्यक्षरित्या जिल्हाधिकारी करीत असतो. ते कार्यक्रम ज्यांच्यासाठी राबवले जात आहे. त्यांना यांचा लाभ होतो किंवा नाही तसेच कार्यक्रम गतिशील आहे किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी सुद्धा जिल्हाधिकारी यांचीच असते. जर विकास कामाची गती मंदावली असेल तर तशा स्वरूपाच्या सुचना जिल्हाधिकारी संबंधितांना देत असतात त्या कार्यक्रमात जर गैरप्रकार दिसून आला असेल तर त्यावर म्हणजे संबंधीतावर योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना आहे हा जिल्हाधिकारी यांचा पहिला आणि महत्वाचा अधिकार आहे.

(2) <u>महसूल विषयक कार्य</u> -

वास्तविक पाहता याच कार्यासाठी या पदाची निर्मिती झालेली आहे. महसूल विषयक काम करण्याच्या उद्देशाचे किंवा याच हेतूने जिल्हाधिकारी हे पद प्राचीन आणि मध्ययुगीन काळात निर्माण झालेले आहे. आज जिल्हाधिकारी यांच्यावर जरी अनेक कार्याच्या जबाबदाऱ्या असतील तरी पण महसुलविषयक कार्य सुद्धा याच पदाला करावे लागते. जमीन महसुलीच्या वसुलीसाठी जिल्हाधिकारी प्रयत्नशील असतात. महसूल या घटकावरच कोणत्याही राज्याचा विकास आणि विकासाची गती अवलंबून असते. आणि म्हणून महसूल वसूलीच्या कार्याकडे राज्यसरकार अधिक जागरूकतेने

दि. 21-09-2001

त्रास देणे जे कार्य जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून पा
पाळले जाते. थोडक्यात म्हणजे प्रारंभापासूनच हे कार्य
जिल्हाधिकारी यांच्याकडे आहे.

③ कायदा व सुव्यवस्था -

जिल्हाधिकारी यांच्या या कार्याला अलिकडे अधिक महत्व प्राप्त झालेले आहे. प्रत्यक्षात कायदा व सुव्यवस्था हा विषय जरी पोलीस यंत्रणेकडे दिला असेल तरीपण जिल्हाधिकारी यांचे संपूर्ण नियंत्रण या यंत्रणेवर असते. कारण अंतीमतः कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने आणि जिल्हा प्रशासनाचा प्रमुख या नात्याने जिल्हाधिकाऱ्यांची आहे. म्हणूनच जिल्ह्यात कुठेही अनुचित प्रकार घडला किंवा दंगल झाली अथवा होण्याची परिस्थिती निर्माण झाली तर तेथे जिल्हाधिकारी प्रत्यक्ष भेट देतात तेथील परिस्थिती पाहणी करतात. सामाजिक शांतता निर्माण होण्यासाठी जनतेला आव्हान करतात आणि तेथील पोलीस यंत्रणेला जागरुकता बाळगण्याच्या सूचना देतात. एखादया ठिकाणी जरी अशी घटना घडली तरी त्याचे परिणाम जिल्ह्यातील अन्य ठिकाणी सुद्धा होण्याची शक्यता असते. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व ठिकाणीच अशा प्रकारच्या सूचना जिल्हाधिकारी यांच्या कडून जात असतात. यालाच जिल्हाधिकारी यांचे कायदा व सुव्यवस्था याबाबतचे अधिकार असे म्हणतात.

④ आपत्तीपासून संरक्षण करणे -

जिल्ह्यातील जनतेवर जर एखादी नैसर्गिक आपत्ती ओढवली तर अशा परिस्थितीमध्ये

दि. २१-०९-२००१

नैसर्गिक आपत्तीपासून सर्वसामान्य जनतेचे संरक्षण करण्याची जबाबदारी जिल्हाप्रशासनाची म्हणजेच जिल्हाधिकारी यांची असते. जसे की भूकंप, महापूर, अतिवृष्टी, आग लागले, अनावृष्टी या आणि अशानैसर्गिक आपत्तीमध्ये जर जिल्ह्यातील जनता सापडली तर अशा परिस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांच्या जबाबदारीत आणि कार्यात अधिक वाढ होते. जसे की, 1983 ला नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील बराचसा भाग हा पुराच्या वेढ्यात सापडला होता. भूकंप काळात लातूर जिल्ह्यात, आलेली आपत्ती आणि त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांना पार पाडावी लागलेली कार्य अशा सर्व प्रकारच्या आपत्तीपासून व संकटापासून नागरिकांचे संरक्षण करावे लागते आणि ते संरक्षण करण्याची जबाबदारी कलेक्टरवरती असते.

(क) विकास व कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी

आधुनिक काळातील जिल्हाधिकारी पदाकडे ही महत्त्वाची जबाबदारी आहे. कारण नितिनिर्देशक तत्वामधीच असलेल्या काही तरतुदीनुसार जनतेच्या सर्वांगिण विकासाची जबाबदारी राज्य सरकारची आहे. विशेषता पंचायतराज विधेयक पास झाल्यापासून तर त्या क्षेत्रातील कार्य वाढले आहे. ज्या विविध कल्याणकारी योजना नियमाने राबवल्या जातात त्या जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार व त्यांच्याच नियंत्रणाखाली राबवल्या जातात. आज अशा अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जात आहे व त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी जिल्हाधिकारी करवून घेतात.

Scanned with OKEN Scanner

दि. 21-09-2021

(6) न्याय विषयक अधिकार -

जिल्हाधिकारी यांनाच दुसरे नाव दंडाधिकारी असे आहे. जिल्हा दंडाधिकारी या नात्याने जिल्हाधिकाऱ्यांना काही न्यायीक स्वरूपाचे कार्यसुद्धा पार पाडावी लागतात. या अनुषंगाने शेती अथवा जमीन महसूल विषयक तंटे जिल्हाधिकाऱ्याकडून पार पाडले जात अशावेळी एक न्यायाधिश म्हणून त्यांची भूमीका असते.

(7) महत्वाच्या व्यक्तींच्या भेटी घेणे -

योजना राबवित असताना विवि मंत्री; केंद्र सरकारचे पदाधिकारी, राज्य सरकारचे प्रतिनिधी जिल्ह्यांना प्रत्यक्ष भेटी देत असतात. काहि वेळा केंद्र किंवा राज्य सरकारच्या विविध समित्याचे सदस्य कार्यक्रमांना भेटी देतात अशावेळी जिल्हाधिकारी त्यांना जिल्ह्यातील चालू असलेल्या कामाची माहिती प्रत्यक्ष भेटीतून देतात काहि वेळेला प्रत्यक्षात प्रकल्पही दाखविण्यात.

(8) सार्वजनिक कार्यक्रमातील सहभाग -

जिल्ह्यामध्ये जे महत्वाचे कार्यक्रम होत असतात अशा काहि निवडक कार्यक्रमांना जिल्हाधिकारी उपस्थित राहतात. तसेच जिल्ह्यातील विविध क्रिडा स्पर्धा, सांस्कृतीक कार्यक्रम यांच्या प्रमाण पत्राचे ही वितरण करतात. कारण एक सन्मानिय पद व व्यक्ती म्हणून जिल्हाधिकारी पदाकडे पाहिले जाते याकरिता संपूर्ण जिल्ह्यात त्यांच्या प्रवासही होत असतो. आपल्या प्रवासात जनतेकडून आलेल्या तक्रारीचेही ते दखल

Scanned with OKEN Scanner

दि. २१-०९-२००१

घेतात. अनेकदा लोकशाही दिन दर महिन्याला पाळला जातो. यालाच तक्रार निवारण दिन असेही म्हणतात. या दिवशी जिल्ह्यातील वेगवेगळ्या विभागांच्या विरुद्ध आलेल्या तक्रारीवर विचार केला जातो आणि त्याचदिवशी त्या तक्रारी निकाली काढल्या जातात. यावेळी जिल्हाधिकारीच या कार्यक्रमांचे प्रमुख असतात. याही ठिकाणी त्यांचे न्यायीक स्वरूपाचे कार्य दिसून येते.

(९) ~~जिल्हाती~~ जिल्ह्यातील विविध कार्यालयांना भेटी देवून पाहणी करणे -

जिल्हाधीकारी हा जिल्ह्यातील कोणत्याही शासकीय कार्यालयांना भेटी देवू शकतो. तेथील कागदपत्रांची तपासणी करु शकतो व त्यांच्याकडून अहवाल सुध्दा मागवू शकतात.

(१०) जिल्हातील आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्याला पूर्वी वर्षाला पाठवावा लागत असे. पण आता दरोज हा अहवाल जिल्हाधिकाऱ्याला राज्य सरकारकडे पाठवावा लागतो.

अशा या व्यापक आणि विस्तृत अधिकारामूळेच जिल्हाधिकाऱ्याला 'जिल्हाप्रशासनाचा आधारस्तंभ' मानले जाते. जिल्हाधिकारी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना प्रत्यक्षात राबवीत असल्यामूळे त्यांना शासनाचे कान व डोळे समजले जाते. या सर्व कार्याचे संतुलीत स्वरूप पाहता असा निष्कर्ष काढता येतो की जिल्ह्यातील सर्वच क्षेत्रात जिल्हाधिकाऱ्याचे

दि. 22-09-2001

## जिल्हाधिकारी आणि पोलीस यंत्रणेचे परस्पर संबंध

जिल्हाधिकारी यांचा पोलीस यंत्रणेशी जिल्हा दंडाधिकारी म्हणून संबंध येतो. अशा प्रकारचा संबंध हा ब्रिटिश कालापासूनच आलेला आहे. जेव्हा जिल्हाधिकारी जिल्हादंडाधिकारी म्हणून भूमीका पार पाडतात. अशावेळी ~~त्यांच्या~~ त्यांचा पोलीस यंत्रणेशी जवळचा संबंध येतो. कारण कायदा व सुव्यवस्थेची महत्वपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्यावर असते. जिरी कायदा व सुव्यवस्था पोलीस यंत्रणेच्या माध्यमातून राखण्याचा प्रयत्न जिल्हाधिकारी करीत असतात पोलीस यंत्रणेच्या सहकार्यानेच कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम जिल्हाधिकारी यांना पार पाडावे लागते. म्हणून जिल्हाधिकारी आणि पोलीस यांचे दैनंदिन प्रशासनात जवळचे संबंध आहेत हे संबंध खालील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

(1) जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था जिल्हाधीकारी पोलीस यंत्रणेच्या माध्यमातून पार पाडतात.

(2) जिल्ह्यातीली जी गुन्हेगारांची आणि गुन्ह्याची परिस्थिती आहे त्याची माहिती जिल्हापोलीस प्रमुख जिल्हाधिकारी यांना वेळोवेळी देत असतात.

(3) जिल्हाधिकारी या नात्याने ते जिल्ह्यातील कोणत्याही पोलीस स्टेशनला अचानक भेट देऊ शकतो. तेथील दस्तऐवजाची पाहणी करू शकतात. त्या पोलीस स्टेशनचा दारूगोळा, शस्त्रास्त्रे यांची माहिती घेऊ शकतात.

(4) जिल्हा प्रशासनाचे प्रमुख या नात्याने वेगवेगळ्या

दि. २२-०५.२०१

तक्रारी जिल्हाधिकारी यांच्याकडे येत असतात. अशा वेळी ते पोलिसांच्या मदतीने त्या आलेल्या तक्रारींची चौकशी करू शकतात.

(5) जिल्हाधिकारी आपल्या जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या अहवाल वेळोवेळी राज्यसरकारला पाठवतात : हा अहवाल पाठविण्यापूर्वी जिल्ह्यातील विविध पोलीस अधिकाऱ्याकडून माहिती देण्यात आलेली असते.

(6) सार्वजनिक सभा, मिरवणूका, उत्सव, सन या सर्व परिस्थितीमध्ये शांतता कायम राहण्यासाठी जिल्हाधिकारी पोलीस यंत्रणेला मार्गदर्शन करीत असतात. आणि त्या अनुषंगाने त्यांना आदेश देत असतात.

(7) जिल्ह्यातील काही विशिष्ट लोकांना संरक्षण आणि शस्त्र बाळगण्याचा परवाना देण्यात आलेला असतो असा परवाना देण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना आहे. तसेच त्यांचे नूतनिकरण करण्यात आले आहे कींवा नाही त्याचे तपासणी करणे.

अशा प्रकारे जिल्हाधिकारी आणि पोलीस यंत्रणा यांचे परस्पर संबंध आहेत आणि ते दोन्ही परस्परांना पूरक असे आहेत.

+

प्र - - जिल्हाधिकारी व पोलीस यंत्रणेचे परस्पर संबंध स्पष्ट करा.

दि. 24-09-2001

## जिल्हाधिकारी यांचे बदलते स्वरुप

संस्था मग ती कोणतीही असो कार्यभार त्या संस्थेमध्ये थोडे फार बदल होत असतात जरी त्याचं स्वरुप बदलले तरी ही अस्तित्व मात्र कायम राहते. ज्या संस्था काळाच्या प्रवाहात आपले अस्तित्व टिकवून ठेवतात. त्या समाजासाठी हितकारक असतात असे पाश्चिमात्य राजकीय विचारवंत ॲरिस्टॉटल यांचे मत होते. त्यांचे हेच विचार जिल्हाधिकारी पदासाठी सुद्धा लागू पडतात. कारण कार्यभाग जिल्हाधिकारीच्या पदात बदल झालेले दिसून येतात तरी पण हे पद आजपर्यंत टिकून आहे यांचाच अर्थ समाजाला त्याची नितांत आवश्यकता आहे. आज जिल्हाधिकारी यांचे कार्यक्षेत्र खूपच बदलले आहे. या बदलत्या स्वरुपास अनेक घटक कारणीभूत आहेत आज त्यांची भूमीका कशा स्वरुपाची आहे. हे काही मुद्द्यांच्या विचार करता समजू शकते.

### 1) मालक नसून सेवक -

आज जिल्हाधिकारी यांची भूमीका मालका सारखी नसून ती जनसेवकासारखी आहे. जिल्हाधिकारी यांचे कार्य सत्ता आणि अधिकार हे पूर्वी पेक्षा वेगळ्या स्वरुपाचे आहेत. हे पद प्रशासनातील सर्वात जुने पद मानले जाते. आणि म्हणून जुन्या काळी विशेषतः ब्रिटिश काळात या पदाची भूमीका मालका सारखी होती परंतू तशी भूमीका आज पाहवयास मिळत नाही आज एका जनसेवक भूमीकेत जिल्हाधिकाऱ्याला कार्य

दि. २८-०९-२००१

करावे लागते.

② राज्याचे बदलते उद्दीष्टे -

पुर्वी जी राज्यसंस्था होती, त्या राज्य संस्थेचे उद्दीष्टे अतिशय मर्यादीत स्वरुपात होते. बाह्य शत्रू पासून राज्यातील नागरीकांचे संरक्षण करणे आणि महसूल गोळा करणे एवढेच मर्यादीत उद्दीष्ट असल्याने जिल्हाधिकारी यांच्यावर सुध्दा महसूल गोळा करणे या एकाचकार्याची प्रामुख्याने जबाबदारी होती.

परंतू आज समाजवादी समाजरचना आणि कल्याणकारी राज्याची उद्दीष्टे राज्या समोर असल्याने व्यक्तीच्या ~~[illegible]~~ सर्वांगिन विकासाची जबाबदारी राज्यावर पडते ही जबाबदारी पार पाडण्यासाठी विविध प्रकारच्या योजना राबविण्यात आलेल्या आहेत अशा योजना प्रत्यक्ष राबविण्याची जिल्हा प्रशासनावर म्हणजेच जिल्हाधिकारी यांच्यावर आहे

थोडक्यात म्हणजे राज्याचे उद्दीष्ट बदलल्याने जिल्हा धिकाऱ्याची भूमीका बदलली

③ विकास अधिकारी म्हणून भूमीका -

उपरोक्त मुद्द्यात स्पष्ट केल्या प्रमाणे विविध योजना जिल्हाधिकारी प्रत्यक्षात अमलात आणतात. त्या माध्यमातून जिल्ह्याचा भौगोलीक विकास आणि सामाजिक विकास घडून आणतात विकास कार्यावर त्यांचीच देखरेख असते. ते नियंत्रण ठेवत असतात आणि म्हणून त्याची भूमीका आज एक विकास अधिकारी म्हणून

① आधुनिक काळातील जिल्हाधिकाऱ्यांची भूमीका स्पष्ट करा

दि. ~~२४~~-09-2001

पाठबळ प्राप्त मिळते

[4] ~~समनवयक~~ - समन्वयक -

विकासाच्या विविध योजना राबवी-ले असतात जिल्ह्यातील वेगवेगळ्या कार्यालयामध्ये परस्परात सहकार्य असणे गरजेचे असते त्या साठी विविध संस्थांमध्ये व विभागामध्ये समन्वय असणेही गरजेचे आहे हा समन्वय साधण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्यावर आहे. जसे की जिल्ह्यातील कृषी खाते, जलसंधारण विभाग आणि म. रा. वि. म. यांच्यात जर परस्पर समन्वय असेल तरच कृषी विकास होवू शकतो अशा परिस्थितीमध्ये जिल्हाधिकारी समन्वयक म्हणून भूमीका पार पाडतात

[5] राज्यसरकार व जनता यामधील दुवा म्हणून कार्य करणे -

जिल्हाधिकारी हे शासनाचे प्रतिनिधी असल्याने शासनाच्या विविध योजना जनसामान्यापर्यंत आणणे आणि जनतेच्या ज्या काही इच्छा, आकांक्षा आहेत त्या सरकार पर्यंत नेणे म्हणजेच शासन आणि जनता या मध्ये दुवा साधणे हे जिल्हाधिकाऱ्यांचे एक कर्तव्य मानले जाते नियोजन प्रमाणात आल्यानंतर जिल्ह्यात या नियोजनाच्या माध्यमातून विकास कामे करण्याची अधिक जबाबदारी जिल्हाधीकाऱ्यावर आलेली आहे

सारांश स्वरूपात थोडक्यात असे म्हणता येईल की आज जिल्हाधीकारी यांची भूमीका निश्चितच बदललेली आहे.

Scanned with OKEN Scanner